॥ अजून त्या झुडुपांच्या मागें ॥

गायकः दशरथ पुजारी
गीतः वसंत बापट
संगीतः दशरथ पुजारी

अजून त्या झुडुपांच्या मागें, सदाफुली दोघांना हंसते
अजून अपुल्या आठवणींनी, शेवंती लजवंती होते ॥ धृ. ॥

तसें पहाया तुला मला ग, अजून दंवबिंदू थरथरतो
अर्ध्यामुर्ध्या कानगुजास्तव, अजून ताठर चंपक झुरतो ॥ १ ॥

पाठ आठवुन तुझी बिलोरी, अजून हिरवळ हिरमुसलेली
चुंबायाला तुझीं पावलें, फूलपाखरें आसुसलेलीं ॥ २ ॥

अजून गुंगीमधें मोगरा, त्या तसल्या केसांच्या वासें
अजून त्या पात्यांत लव्हाळी, होतच असते अपुलें हासें ॥ ३ ॥

अजून फिक्कट चंद्राखाली, माझी आशा तरळत आहे
गीतांमधलें गरळ झोकुनी, अजून वारा बरळत आहे ॥ ४ ॥